कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो ३ मार्ग

## वायुविजन व स्थानकांच्या वातानुकुलनच्या कामाला निविदाकारांचा भरघोस प्रतिसाद

मुंबई, १८ मार्च २०१७ : संपूर्णत: भुयारी असलेल्या कुलाबा – वांद्रे – सीप्झ या मेट्रो ३ मार्गच्या वायुविजन, स्थानकांचे वातानुकुलन व पर्यावरण नियंत्रण प्रणालीविषयक कामांकरीता पात्र निविदकारांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (मुं.मे.रे.कॉ) आयोजित केलेल्या पूर्व अर्हता बैठकीमध्ये मे. ब्लू स्टार ॲन्ड सी डॉक्टर समूह, मे. इटीए इंजीनिअरीग प्रा.लि., मे आयसॉलक्स इन्गनिरीया एस.ए, मे. स्टर्लिंग व विल्सन जी.वाय.टी. समूह व मे. वॉल्टाज एस.टी.इ.सी समुहाने हजेरी लावली.

भुयारी मेट्रो मध्ये वायुविजन व वातानुकुल प्रणाली महत्त्वाची भूमिका पार पाडते. वायुविजन व वातानुकुलन प्रणाली विषयक असलेल्या तांत्रिक व आर्थिक बाबींवर चर्चा करण्यासाठी तसेच स्पर्धात्मक निवीदा प्रक्रियेविषयी अधिक माहिती देण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वायुविजन प्रणाली, स्थानकांचे वातानुकुलन यंत्रणेची देखभाल, स्काडासोबत इतर यंत्रणांचे एकत्रिकरण व  धूर गमनाविषयी धोरण या विषयांवर चर्चा करण्यात आली.

मुं.मे.रे.काँ.चे कार्यकारी संचालक श्री. आर.के. शर्मा यांनी याविषयी सांगितले की, ‘‘बैठकीला भरघोस प्रतिसाद मिळाला. संपूर्णत: भुयारी व वातानुकुलीत मेट्रोमुळे प्रवाशांना सुरक्षित व आरामदायी प्रवास करणे शक्य होणार आहे.’’ सदर निवीदा ८ मे २०१७ पर्यंत सादर करता येणार आहे.